ISSN - 2347-7075
Impact Factor - 8.141

# INTERNATIONAL JOURNAL OF ADVANCE AND APPLIED RESEARCH

An International Double-Blind Peer Reviewed / Bi-Monthly /
Referred / Open Access Research Journal





**Rayat Shikshan Sanstha's**

## Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Ramanandnagr (Burli)

Tal.- Palus, Dist.-Sangli, MH (India), 416308

**Affiliated to Shivaji University Kolhapur**

**(NAAC reaccredited A++ grade (with 3.53 CGPA) in 4th cycle)**

**ICSSR, NEW DELHI SPONSORED**

**Two Days Multidisciplinary National Seminar on**

## "CHANGING SCENARIO OF INDIAN MONSOON AND ITS IMPACT ON AGRICULTURAL ECONOMY"

**25th -26th February, 2026**

**Organized by**

**Department of Zoology & IQAC**

**Editors**

**Dr. Nandkumar K. Kamble**

**Dr. Ashiya M. Momin**

Vol. 7 No. 31
March - April 2026

# International Journal of Advance and Applied Research

# (IJAAR)

***A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal***

**ISSN–2347-7075** **Impact Factor–8.141**

## March - April 2026

## Volume - 7 Issue – 31

**Published by:**

Young Researcher Association, Kolhapur, Maharashtra, India

***Website:***[https://ijaar.co.in](https://ijaar.co.in)

**Submit Your Research Paper on Email**

**Regular Issue:** editor@ijaar.co.in

For Publication Call On - **8624946865**

**INTERNATIONAL JOURNAL OF ADVANCE AND APPLIED RESEARCH**
ISSN – 2347 -7075 (DOUBLE-BLIND Peer Reviewed) (Bi-Monthly Research Journal)
**Vol. 7 No. 31**
**March - April 2026**

**TABLE OF CONTENT**


| Sr. No. | Name of Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | V. V. Ajagekar<br>K. J. Adate<br>K. N. Nikam | Diversity of Phytoplankton in Khanapur Freshwater Reservoir, Ajara (Kolhapur District): A One-Year Limnological Study (Jan–Dec 2025) | 1 - 4 |
| 2 | Nikita Salunkhe<br>Dr. D. M. Karanjkar<br>Prathamesh Bhosale | Embryonic and Larval Development of Ornamental Fish Japanese Koi (Cyprinous Rubrofuscus) by Induced Breeding Technique | 5 - 9 |
| 3 | Bhaskar Shamrao Chikhalikar | The Use of Artificial Intelligence in Library Administration | 10 - 12 |
| 4 | डॉ. सचिन श्रीरंग चव्हाण | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची शेती विकासाची धोरणे व नवीन प्रयोग | 13 - 17 |
| 5 | Bhushan Y. Pawar | Role of Youth in Modern Democracy | 18 - 21 |
| 6 | Nikita Salunkhe<br>Dr. D. M. Karanjakar<br>Prathamesh Bhosale | Preparation of Nutritious Fish Snacks by Using Tilapia Fish Muscle | 22 - 26 |
| 7 | श्री. भूषण युवराज पवार | डिजिटल युगातील मानवी हक्क आणि न्यायपालिका | 27 - 35 |
| 8 | Dr. Sachin Vilas Yadav<br>Dr. Pravinkumar Bharatkumar Lupane | Impact of Monsoon on the Industrial Sector in Maharashtra: A Focus on Manufacturing Sector | 36 - 41 |
| 9 | Mr. Sachin Tanaji Lavate<br>Mr. Sushen Dnyanu Kamble | Tidal Memory: The Sundarbans as a Post-Natural Landscape in Amitav Ghosh's *The Hungry Tide* and *Gun Island* | 42 - 45 |
| 10 | डॉ. प्रविणकुमार भरतकुमार लुपणे<br>डॉ. सचिन विलास यादव | सांगली जिल्ह्यातील सेंद्रिय शेतीचे SWOC विश्लेषण | 46 - 52 |
| 11 | श्री. महाले मधु बावजू | नाशिक जिल्हयातील मान्सूनची बदलती परिस्थिती आणि त्याचा कृषी अर्थव्यवस्थेवर परिणामाचा इतिहास (इ. सन. 2005 – इ. सन. 2025) | 53 - 63 |
| 12 | Dr. Y. S. Pathan | To Study the Water Availability and Requirement of Solapur District from A Geographical Perspective | 64 - 70 |
| 13 | A. C. Mulani<br>T. A. Shaikh | Effect of Climate-Induced Rainfall Variability on Pest–Predator Interactions in Agro-Ecosystems | 71 - 78 |
| 14 | Ms. Anita Balbhim Mamlayya | Role of Plant Hormones in Crop Adaptation to Drought and Water Stress Conditions | 79 - 85 |
| 15 | Suvarna R. Yadav | Comparative Study of Crop Productivity in Irrigated and Rainfed Agricultural Systems | 86 - 91 |
| 16 | प्रा. सरिता निवास निकम<br>राजेश मोहन पवार | हवामान बदल आणि भारतीय शासन | 92 - 97 |
| 17 | राजेश मोहन पवार<br>प्रा. सरिता निवास निकम | भारतीय  शासन व पर्यावरण कायदे : एक सखोल अभ्यास | 98 - 101 |
| 18 | डॉ. शितल चंद्रकांत पाटील<br>प्रा. सौ. शुभांगी प्रशांत शेडगे | आधुनिक शेती पद्धतीत नवकृषी तंत्रज्ञानाचे महत्त्व | 102 - 105 |

| Sr. No. | Name of Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 19 | प्रा. सौ. शुभांगी प्रशांत शेडगे<br>डॉ. शितल चंद्रकांत पाटील | मराठी साहित्यात हवामान बदलाचा कृषी जीवनावर होणारा परिणाम याचे चित्रण | 106 - 110 |
| 20 | Suvarna Pol<br>Amruta Padule<br>Vivek Netam | Food Additives and Their Impact on Human Health: A Review of Current Evidence | 111 - 115 |
| 21 | डॉ. सदाशिव राजाराम बनकर | बदलत्या हवामानाचा कृषी अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 116 - 119 |
| 22 | प्रा. दिलीप शामराव कदम | हवामानातील बदल | 120 - 125 |
| 23 | Ms. Bhagyashree Shamrao Kumbhar<br>Mr. Shailesh Bhimrao Kamble | Indus Valley Civilization - Climate Changes and Crop Pattern | 126 - 130 |
| 24 | Mr. Sachin Tanaji Lavate<br>Prin. Dr. Yuvaraj B. Gonde | Agricultural Environment, Climate in touch with Multiculturalism in the Austine Clarke's 'The Polished Hoe' | 131 - 134 |
| 25 | Mr. Daunde Sandesh Shivaji | Artificial Intelligence: Innovations in Sport Activities | 135 - 139 |
| 26 | Priyanka Dinkar Jirage<br>Rohini Suryawanshi | Solution of Algebraic Equations by the method of Vedic Mathematics: "Gunitsamuchhyah" | 140 - 142 |
| 27 | Jadhav S. S.<br>Patil B. D. | Wet Drought Caused by Excessive Rainfall and its Impact on Indian Agriculture | 143 - 149 |
| 28 | Dr. Shinde Santosh Laxman | Climate Change: A Crisis for Nature, Humanity and Impact on Agriculture | 150 - 154 |
| 29 | Monika Shinde<br>Nanda Borade | Cloud Computing: Benefits, Challenges and Future Trends | 155 - 160 |
| 30 | Nanda Borade<br>Monika Shinde | Role of Artificial Intelligence in Agriculture | 161 - 165 |
| 31 | Satape A. A.<br>Kadam A. P. | Role of Artificial Intelligence in Education System | 166 - 170 |
| 32 | Arpita P. Kadam<br>Akshada A. Satape | AI for Climate Protection | 171 - 175 |
| 33 | Miss. N.V. Zambre<br>Mrs. A. B. Madavi | Monitoring Land Use and Land Cover Change in Tasgaon and Palus Tahsils Using Remote Sensing and GIS (1993-2023) | 176 - 182 |
| 34 | B. P. Jamadade<br>G. R. Patil<br>N. A. Gaikwad<br>S. M. Ravatale<br>S. D. Bathe | Evolving Dynamics of the Indian Monsoon: Physical Drivers and Macroeconomic Consequences: A Review | 183 - 185 |
| 35 | N. A. Gaikwad<br>G. R. Patil<br>B. P. Jamadade<br>S. M. Ravatale<br>S. D. Bathe | Dynamics of the Indian Monsoon System: A Physics-Based Assessment of Agricultural Economic Impact | 186 - 191 |
| 36 | S. D. Bathe<br>Dr. G. R. Patil<br>N. A. Gaikwad<br>B. P. Jamadade<br>S. M. Ravatale | Thermodynamic and Dynamic Analysis of Indian Monsoon Extremes and Agricultural Sustainability: A Review | 192 - 195 |

| Sr. No. | Name of Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 55 | Mr. Harshad Jagdishchandra Jaunjal<br>Prin. Dr. Ujwala Vijay Patil | Climate Change and Agriculture in India: Impacts, Strategic Knowledge, and Adaptation Pathways | 292 - 295 |
| 56 | Mr. Sushen Dnyanu Kamble<br>Mr. Sachin Tanaji Lavate | Monsoon Disruption and Climate Change in Amitav Ghosh's *The Great Derangement* | 296 - 298 |
| 57 | Dr. Manisha C. Mhaske<br>Dr. Anuradha D. Pawar | Agroecology, Agroforestry, and Regenerative Agriculture as Tools for Biodiversity Conservation | 299 - 301 |
| 58 | Arundhati Kamble<br>Gouri Waydande | Role of Plant Growth-Promoting Rhizobacteria (PGPR) in Enhancing Crop Tolerance to Drought Stress | 302 - 308 |
| 59 | Gouri Waydande<br>Arundhati Kamble | Influence of Soil Microbial Communities on Nutrient Cycling Under Changing Monsoon Patterns | 309 - 316 |
| 60 | Ms. Shubhangi Nivrutti Lavate<br>Dr. Ravindra Ashok Kulkarni | Magic Realism in Guntur Grass's '*The Tin Drum*' | 317 - 318 |
| 61 | डॉ. शितल चंद्रकांत पाटील | बाळशास्त्री जांभेकर व लोकहितवादी यांचे उदारमतवादी विचार | 319 - 323 |
| 62 | Vrushali Maruti Nalawade | Impacts of High-Intensity Rainfall on Beneficial Insect Biodiversity | 324 - 327 |
| 63 | Rohini Suryawanshi<br>Priyanka Jirage | Applications of Graph Theory in Data Science | 328 - 330 |

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 31 March – April - 2026

# बाळशास्त्री जांभेकर व लोकहितवादी यांचे उदारमतवादी विचार

**डॉ. शितल चंद्रकांत पाटील**

*सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग*

*डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली)*

*Corresponding Author - डॉ. शितल चंद्रकांत पाटील*

**DOI - 10.5281/zenodo.20293451**

**प्रस्तावना:**

पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये उदारमतवादी विचारसरणीचा विकास झाला होता. त्याचा प्रभाव भारतावर परिणामता: महाराष्ट्रावर पडला होता. पाश्चात्य शिक्षण घेऊन जो प्रबोधनातील चळवळीमध्ये सक्रीय झालेला एक नवीन वर्ग उद्याला आला होता. प्रस्तुत वर्ग उदारमतवादी विचारसरणीने प्रभावित झाला होता. त्यामध्ये महाराष्ट्रातील बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादी विचारवंतावर उदारमतवादी तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडला होता. प्रस्तुत विचारवंत हे उदारमतवादी विचारांनी भारावलेले होते. महाराष्ट्रामध्ये जो उदारमतवाद स्वीकारला गेला त्या उदारमतवादाला सामाजिक सुधारणेची जोड होती. महाराष्ट्रामध्ये जो सुशिक्षित विचारवंतांचा, समाजसुधारकांचा समूह होता तोच समूह राष्ट्रीय नेते अशी परिस्थिती एकोणिसाव्या शतकामध्ये होती त्याला राष्ट्रीयत्वाचा देखील संबंध होता.

महाराष्ट्रातील उदारमतवाद हा समाज स्वास्थ्याशी जोडला होता. सामाजिक सौदार्ह, शांततेशी उदारमतवादी संकल्पना जोडली गेली होती. उदारमतवादी तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून प्रचलित समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक प्रगती, सामाजिक न्यायाकडे महत्त्वपूर्ण वाटचाल करता येईल अशी श्रद्धा तत्कालीन उदारमतवादी भूमिका घेणाऱ्या विचारवंतांच्या मध्ये निर्माण झाली होती. या तत्त्वज्ञानाच्या आधारे दुबळ्या, वंचित, स्त्री वर्गाला न्याय मिळावा यासाठी प्रयत्न केले गेले. सद्सद्विवेकाला बुद्धीवादाच्या तत्वाच्या आधारे सत्याचा पाठपुरावा करण्यावरती भर दिला गेला. समाज सुधारणेमध्ये विचार - आचार स्वातंत्र्याला प्राधान्य दिले गेले. मानवी मूल्यांचा प्रचलित रूढी परंपरांमध्ये मनुष्याच्या विचारांचा पुरस्कार केला गेला. व्यक्ती - व्यक्तीचा भेदभाव, जातीभेद, धर्मभेद, लिंगभेद मानणाऱ्या प्रवृत्ती विरोधात चळवळी उभ्या केल्या. सामाजिक अन्यायाला विरोध, सामाजिक सुधारणेचा पुरस्कार, शिक्षणाला प्रोत्साहन अशा पद्धतीने आधुनिक उदारमतवादी वैशिष्ट्यांच्या आधारे महाराष्ट्रामध्ये बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळकृष्ण गोखले इत्यादी विचारवंतांनी उदारमतवादी विचारांची मांडणी केली. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मध्ये बाळशास्त्री जांभेकर आणि लोकहितवादी यांच्या उदारमतवादी विचारांचा अभ्यास केला आहे.

**बाळशास्त्री जांभेकर यांचे उदारमतवादी विचार:**

बाळशास्त्री जांभेकर हे पाश्चिमात्य उदारमतवादी शिक्षणाचे पश्चिम भारतातील पहिले अपत्य होते. ते एक विचारवंत, शिक्षणतज्ञ, पत्रकार आणि समाज सुधारक म्हणून त्यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. जांभेकरांनी १८३२ झाली 'दर्पण' हे इंग्रजी मराठी वृत्तपत्र सुरू केले. प्रस्तुत वृत्तपत्राच्या माध्यमातून तत्कालीन धार्मिक आणि राजकीय जीवनात उदारमतवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. जांभेकरांनी कायद्याचे राज्य या संकल्पनेचा जोरदार पुरस्कार केला. त्यांनी व्यक्तीच्या राज्यसंस्थेविरुद्ध बंड करण्याच्या अधिकारांचा त्यांनी कधीही समर्थन केले नाही.

**दर्पण आणि उदारमतवाद:**

१८३२ साली बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' नावाचे वृत्तपत्र सुरू केले. प्रस्तुत घटना ही आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाची घटना होती. जांभेकरांनी 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू करताना त्यांनी उदारमतवादी विचारचौकटीचा स्वीकार केला होता. वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नाकरिता एक व्यासपीठ उपलब्ध झाले होते. 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू करण्यापाठीमागचे उद्दिष्ट स्पष्ट केले होते. त्यामध्ये ते असे म्हणतात की, इंग्रजी शिक्षणाने भारावलेला सुशिक्षित वर्गाला नवीन मूल्यांची ओळख व्हावी याकरता वृत्तपत्र हे मराठीतून असली पाहिजे अशी गरज निर्माण झाली होती. मुंबई शहरातून इंग्रजी भाषेत व बंगाली वर्तमानपत्र निघत होती, प्रस्तुत पत्राप्रमाणे मराठी भाषेमध्ये वर्तमानपत्रे असावी अशी कल्पना पुढे येत होती. समाजातील विविध घटनांवर स्वतंत्र विचार करणारा स्वतःच्या हक्काविषयी जागरूक असणारा समाजाच्या कल्याणासाठी झटणारा असा नवीन वर्ग घडविला पाहिजे असा त्यांचा मानस होता. 'स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्याचा अभ्यास अधिक व्हावा देशाची समृद्धी व येथील लोकांचे कल्याण याविषयाची स्वतंत्रपणे व उघड रीतीने विचार करायला स्थल व्हावे. म्हणूनच दर्पण सुरू करण्यात येत आहे असे त्यांनी भूमिका स्पष्ट केली'. म्हणजेच समाजाचे कल्याण हाच उद्देश समोर ठेवून 'दर्पण' या वृत्तपत्राची निर्मिती केली होती. तत्कालीन समाजाला अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी 'दर्पण' हे एक साधन म्हणून समाजासमोर उभे केले होते.

बाळशास्त्री जांभेकर आणि 'दर्पण' मधून विविध समाजउपयोगी विषयावर चर्चा घडवून आणली. स्वातंत्र्य, स्त्री - पुरुष समानता, पाश्चात्त्य तत्त्वज्ञान इत्यादींची माहिती जास्तीत जास्त व्यक्तींच्या पर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. सरकारने शेतकऱ्यांना सहाय्य व प्रोत्साहन द्यावे या उदारमतवादी धोरणांचा ते पुरस्कार करतात. एकंदरीत समाजामध्ये समानता प्रस्थापित करण्यासाठी इंग्रजांनी समानतेचे अनुकूल धोरण अवलंबले पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. तांत्रिक शिक्षणाची गरज, सत्तेचे ज्ञान, मुक्त शिक्षण, प्रसार माध्यमे, स्थानिक राज्याविषयी ब्रिटिश सरकारचे धोरण इत्यादी आणि या विषयाबरोबरच इतिहास, भूगोल, विज्ञान, साहित्य आणि इतर विषयांना सुद्धा 'दर्पण' मध्ये स्थान दिले जात असे. एकूणच 'दर्पण' मधून लोकांच्या भल्यांसाठी सर्वच विषयांची चर्चा करून आधुनिकतेचे विचार लोकांच्या समोर मांडून समाजात जागृती करण्याचा प्रयत्न बाळशाचे जांभेकर यांनी केला होता.

**स्त्री स्वातंत्र्य विषयक विचार:**

'स्त्री' हा समाजाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. स्त्रिया सुशिक्षित झाल्या पाहिजेत हा विचार महाराष्ट्रमध्ये रुजवण्याचा व पाया घालण्याचे काम बाळशास्त्री जांभेकर यांनी केले आहे. स्त्रियांच्या अस्तित्वासाठी व तिच्या स्वातंत्र्यासाठी जांभेकरांनी 'दर्पण' मधून लेख लिहिलेले आहेत. पुनर्विवाह, स्त्रिया, विद्याभ्यास, स्त्री शिक्षण, स्त्री शिक्षणाबद्दलचा दृष्टिकोन, मुलींची मुंज, स्त्री शिक्षणाची

दिशा, स्त्री-पुरुष समान हक्क, हिंदू धर्म आणि स्त्री, हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरीती इत्यादी निबंधातून त्यांनी लेखन केलेले आहे. स्त्रियांना समान हक्क द्यायला पाहिजेत याकरता प्रमाण दाखले देऊन रुक्मिणी व स्त्री शिक्षण, मुंज मुलींची का नाही यासारख्या निबंधातून स्त्रियांच्या हक्काविषयी जाणीव करून देतात.

**स्त्रियांना शिक्षणाचा हक्क:**

बाळशास्त्री जांभेकर हे शिक्षक होते. त्यामुळे समाजातील स्त्रियांना देखील शिक्षण मिळाले पाहिजेत असा त्यांचा उदारमतवादी विचार होता. तरीही स्त्री हि मुलांना कुटुंबामध्ये वळण लावत असते, ओघाने समाजाला देखील वळण लावण्याचे काम ती करत असते. त्यामुळे ते अशिक्षित असून चालणार नाही तर ती सुशिक्षित असली पाहिजे असे त्यांचे मत होते. स्त्री वर्गाकडे कोणतीही जात, वर्ग, धर्म यामध्ये न विभागता एक व्यक्ती म्हणून त्यांनी स्त्रियांचा विचार केला होता. ज्या कालखंडामध्ये पुरुषांना देखील शिक्षणाचा अधिकार नव्हता त्या कालखंडामध्ये त्यांनी स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे असा पुरोगामी विचार त्यांनी मांडला.

**विधवा पुनर्विवाह प्रोत्साहन:**

बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' मधून विधवा पुनर्विवाहाचा जोरदार पुरस्कार केला. त्यांनी विधवा विवाह या चळवळीचा पाया घातला. ऑगस्ट व सप्टेंबर १८३७ च्या दर्पणच्या अंकात जांभेकरांनी हिंदू विवाह, पुनर्विवाह या शीर्षकाने तीन लेख लिहिले. त्यामध्ये ते असे स्पष्ट म्हणतात की, जोपर्यंत बालविवाहची प्रथा सुरू आहे, तोपर्यंत लग्नाच्या वयाला पोचण्यापूर्वी ज्या मुली विधवा झाल्या असतील त्यांना पुन्हा विवाह करायला परवानगी दिली गेली पाहिजे. महाराष्ट्रामध्ये विधवा विवाह चळवळची स्थापना झाली. त्याला न्या. रानडे व विष्णुशास्त्री पंडित यांनी महत्त्वाचे कार्य केले या चळवळीचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला होता.

**लोकहितवादी यांचे उदारमतवादी विचार:**

लोकहितवादी यांनी तत्कालीन समाजाची उदारमतवादी विचारांच्या आधारे चिकित्सा केली. समाजामध्ये धर्माचे प्राबल होते. स्त्रियांचे शोषण करणाऱ्या प्रथा होत्या शिक्षणाचा अभाव होता या सर्व परिस्थिती विरोधात त्यांनी उदारमतवादी विचारांच्या आधारे सुधारणा करण्याचे प्रयत्न केले. पाश्चात्य उदारमतवादी विचारांच्या आधारे नवीन मूल्यावर आधारित आधुनिक समाजव्यवस्थेची मांडणी लोकहितवादी यांनी केली. बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या उदारमतवादी विचारांचा पाया लोकहितवादी यांनी बळकट केला.

**शिक्षणविषयक विचार:**

लोकहितवादीनी आपल्या शतपत्रामधून शिक्षणविषयक विचारांची मांडणी केली. हिंदी लोकांना जर माणूस म्हणून मानाने जगायचे असेल, प्रगत राष्ट्रांच्या मार्गाने जावयाचे असेल तर त्यांनी रूढ जीवनपद्धतीचा त्याग करून नव्या मुलांचा स्वीकार करायला हवा. हे त्यांच्या विचारांचे सूत्र होते. केवळ पाठांतर म्हणजे विद्या नव्हे. संस्कृतातील विद्या आता जुनीपुराणी झाली आहे. त्याच्यापेक्षा १०० पट चांगल्या विद्या आता निघाल्या आहेत. ज्या विद्या कालबाह्य झालेल्या आहेत त्याला ते विरोध करतात. व्यक्तीला सुखमय जगण्यासाठी शिक्षणातील परिवर्तन स्वीकारले पाहिजे यावर त्यांचा भर होता.

**लोकशाहीविषयक विचार:**

लोकहितवादी यांनी राजकीय क्षेत्रात लोकशाहीचा पुरस्कार केला. लोकहितवादी इंग्लंड प्रमाणे येथेही लोकशाही असली पाहिजेत असे ते सांगतात. परंतु येथील सर्व अडथळयांच्या अभ्यास करून जी लोकशाही इंग्लंडमध्ये आहे. ती लोकशाही इथे चालणार नाही तर

इथली लोकशाही वेगळी असावी असे त्यांचे मत होते. लोकशाहीचा विचार करताना प्रस्थापित समाजातील जातीबद्धतेचा विचार बाजूला ठेवला नाही. पार्लमेंटमध्ये सर्व जाती व जमातीच्या लोकांना प्रतिनिधित्व मिळावे असा त्यांचा आग्रह होता. सर्व जाती- जमातीच्या लोकांना प्रतिनिधित्व मिळाल्यानंतर लोकशाही अधिक अर्थपूर्ण होईल असे देखील त्यांचे मत होते. त्यांचे लोकशाहीविषयक धोरण हे सर्वसमावेशक होते.

लोकहितवादी यांच्या राजकीय विचारांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१. लोकहितवादी यांनी उदारमतवादी तत्त्वज्ञान तत्कालीन भारतीय परिस्थितीच्या संदर्भात विशद केले.
२. लोकहितवादी हे लोकसत्ताक होते. जातीनिरपेक्ष व धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा त्यांनी पुरस्कार केला
३. लोकशाही शासन पद्धतीमध्ये संसदीय शासनपद्धती महत्त्वाचे आहे.
४. आपल्या देशाच्या उन्नतीसाठी इंग्रजांकडून वैज्ञानिक व आधुनिक विचारसरणी शिकवून देशाची एक भौतिक, नैतिक व धार्मिक उन्नत केले पाहिजेत असे त्यांनी आग्रह पूर्ण सांगितले.

**स्त्री सुधारणा:**

लोकहितवादी यांनी शतपत्राच्या माध्यमातून 'स्त्री' सुधारणांचा पुरस्कार केला त्यांनी स्त्री सुधारणांकडे मानवतावादी व व्यक्तीस्वातंत्र्यवादी दृष्टीने पाहिले या दृष्टिकोनाला आधुनिकतेचा स्पर्श होता. समाजामध्ये पुरुषांच्या बरोबरीने 'स्त्री' हा घटक देखील तितकाच महत्त्वाचा आहे. धर्म, जात, विवाहसंस्था अनिष्टप्रथा यामध्ये अडकलेल्या 'स्त्री' या घटकाकडे ते उदारमतवादी दृष्टिकोनातून पाहतात.

१८४८ ते १८५० या कालखंडात लोकहितवादी यांनी प्रभाकर मधून जी 'शतपत्रे' लिहिली होती त्यामध्ये स्त्रीविषयक सुधारणा व त्यांचे लेखन येते. यामधील लहानपणीच्या लग्नाविषयी, विधवा पुनर्विवाह, स्त्रियांची स्थिती, वाईट चालीरितीचे प्रकार इत्यादी विषयावर त्यांचे लिखाण येते. स्त्रियांची लवकर लग्न होणे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या याची लोकहितवादीनी विज्ञानवादी दृष्टीने चिकित्सा करतात. बालविवाह ही अतिशय अनिष्ट प्रथा आहे. त्याचे परिणाम अतिशय वाईट आहेत. याकरता लोकांनी मुलींची विवाह हे योग्य वयातच केले पाहिजेत. अल्पवयात मुलींचे विवाह करण्याच्या रूढींपासून लोकांना परावर्तन केले पाहिजेत. यामधून लोकांचे आत्महित स्वदेश कल्याण होईल असे त्यांचे मत होते.

**स्त्री शिक्षण:**

लोकहितवादी स्त्री शिक्षणाचे खंदे पुरस्कार होते. 'स्त्रिया सुशिक्षित होतील तेव्हा त्या आपला अधिकार स्थापतील असे त्यांचे मत होते'. 'शिक्षणामुळे 'स्त्री' वर्गात मोठा बदल घडवून येईल. त्यांना आपल्या दूर स्थितीची जाणीव निर्माण होईल याकरता त्या प्रस्थापित समाजातील जाचक व अन्यायकारक रूढी विरोधात बंड करून उतरतील.' असे लोकहितवादींची मत होते. त्याचबरोबर त्यांनी 'स्त्री' शिक्षणाचा आग्रह धरण्याचे आणखी एक कारण होते. स्त्रियांच्यावर कुटुंब व समाजाचे दायित्व होते. स्त्रिया या जाचक रूढी व परंपरामध्ये अडकले होत्या. तरीही त्यांच्यावर सामाजिक दायित्व होते. म्हणून सामाजिक जबाबदारी पार पाडण्यासाठी शिक्षणाची गरज आहे.

भविष्यामधील पिढ्यांचे भविष्यही यांच्या हातामध्ये आहे असे ते मानत होते. स्त्रियांची स्थिती या आपल्या ३० क्रमांकाच्या पत्रामध्ये ते लिहितात. 'सांप्रत काळी हिंदू लोकांचे स्त्रियांची अव्यवस्था व दुर्दशा फार

आहे. स्त्रिया पुरुषावर अंमल करत असतात व त्यांचे स्वभावाप्रमाणे बहुत लोकांस वागावे लागते. त्यांचे गुण लहान मुलांना प्राप्त होतात त्यामुळे स्त्रिया शहाण्या असणे जरुरी आहे'. यावरून लोकहितवादींची 'स्त्री' शिक्षणाची व्यापक भूमिका स्पष्ट होते.

**धर्म सुधारण्याचा व्यापक दृष्टिकोन:**

धर्मविषयक विचारांचा आढावा घेता, धर्म हा जीवनाचा पाया बळकट करणारा असतो. धर्म हा व्यक्तीच्या जीवनाला उदात्ततेची बैठक देतो. आत्मिक शक्तीचा विकास साधतो. अशी लोकहितवादीची धर्माविषयक धारणा होती. म्हणूनच त्यांनी धर्माची बुद्धीवादी दृष्टीने चिकित्सा केली. एकोणविसाव्या शतकातील धर्मविषयक विचार हे तत्कालीन समाजाचे सर्व बाजूने चिंता वाहणारं होत म्हणून धर्माचा व्यवहार करताना किंवा त्याविषयी चर्चा करताना त्यामध्ये स्त्री शिक्षण, अस्पृश्यता निवारण, जातीभेद नष्ट होणं इत्यादी प्रश्नांची चर्चा येते लोकहितवादी यांच्या धर्मविषयक विचारांमध्ये देखील अशी सर्वांगीण चर्चा येते. धर्म हा परमार्थासाठी नसून तो एहिक जीवनाच्या सुख शांतीसाठी आहे असा महत्त्वाचा विचार लोकहितवादी यांनी सांगितलेला आहे.

**विवेकवाद:**

लोकहितवादी यांनी विवेकाच्या आधारे मानवी व्यवहाराची समीक्षा केली आहे. त्यांनी जो विवेकाचा शोध घेतला आहे त्याचे दोन निकष दिसतात. पहिला निकष असा कि, अनुभवाच्या निरीक्षणाच्या कसोटीवर जे ज्ञान प्रमाण ठरते ते ज्ञान विवेकाधीष्टीत असते आणि दुसरा निकष असा की ज्ञान मानवी व्यवहाराचे, कृत्याचे यशस्वीपणे मार्गदर्शन करते आणि म्हणून उपयुक्त असते ते विवेकाधीष्टीत असते. विवेकाच्या आधारे भारतीय बौद्धिक परंपरेमध्ये जी भिन्न प्रमुख शास्त्रे विकसित झाली त्याची चिकित्सा त्यांनी केली. कालबाह्य झालेल्या पारंपारिक विद्येमुळे मनुष्य हा ज्ञानाच्या भ्रमात सापडतो. त्यामुळे तो व्यावहारीक ज्ञानापासून दूर राहतो. त्यातून त्याची प्रगती होत नाही असे त्यांचे मत होते. म्हणूनच ते विवेकाच्या आधारे मनुष्याच्या व्यवहाराची चिकित्सा करतात. या सर्वच उहापोह ते 'संस्कृत साहित्य' या लेखामध्ये घेतात.

**सारांश:**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये बाळशास्त्री जांभेकर व गोपाळ हरी देशमुख यांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. पारंपारिक चौकटीमध्ये न राहता नवीन मुल्यांचा स्वीकार केला पाहिजे हा त्यांचा उदारमतवादी विचार होता. प्रस्तुत विचार तत्कालीन समाज जागृतीकरिता आणि समाज बदलाकरिता महत्वाचा होता. अंधश्रद्धा, प्रथा परंपरेमध्ये अडकलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी आणि व्यक्तीला हक्क, शिक्षण याची जाणीव निर्माण करण्यासाठी प्रस्तुत विचारवंतानी मांडलेले विचार महत्वपूर्ण आहेत.

**संदर्भ:**


१. चौसाळकर अशोक (२०१४) आधुनिक भारतीय राजकीय प्रवाह, प्योपुलर प्रकाशन,मुंबई
२. धारूरकर वि. ल. (२०११) पत्रकारितेचा दीपस्तंभ आ. बाळशास्त्री जांभेकर , भारतीय समाज विकास आकादमी, मुंबई
३. जोशी अरुण (२०१०) लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, गंधर्व प्रकाशन, पुणे
४. पारीख गोवर्धन (१९७१) लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख,मौज प्रकाशन, मुंबई प्रबोधन प्रकाश ज्योती, ऑक्टोबर , २००२, लोकहितवादी विचारधारा